# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २६ मार्च, २०१८ / चैत्र ५, १९४० (शके)**

**(१) आदिवासी विकास मंत्री**
**(२) उद्योग, खनिकर्म मंत्री**
**(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**
**(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**
**(५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १५**

---

### साखर कारखान्याकडून ऊसाच्या वजन काटा संदर्भात स्थापन केलेल्या भरारी पथकांचा अहवाल प्रलंबित असल्याबाबत

**(१) * ३७९३१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात साखर कारखान्याकडून ऊसाच्या वजनात काटा मारण्याच्या तक्रारीनुसार सर्व जिल्हयात भरारी पथके स्थापन होऊन दोन महिन्याचा कालावधी उलटला तरी नऊ जिल्हाधिकाऱ्यांनी भरारी पथकांचा अहवाल पाठविला नसल्याचे तसेच सातारा, बीड, नांदेड, वर्धा, भंडारा, नागपूर येथील जिल्हाधिकाऱ्यांनी भरारी पथके स्थापन केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थापन केलेल्या भरारी पथकाने सादर केलेल्या अहवालात कोणत्या बाबी आढळून आल्या आहेत, त्यानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) नाही.
(२) भरारी पथकाने कारखान्याचे वजनकाटयाची तपासणी केली असून वजनकाटयामध्ये कोणतीही त्रुटी नसल्याचे तसेच सर्व वजनकाटे सुयोग्य स्थितीत असल्याचा अहवाल सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील नवीन प्रस्तावित प्रकल्पांसाठी आदिवासींचा विरोध असल्याबाबत

**(२) * ३८९३७ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्याची निर्मिती झाल्यामुळे जिल्ह्यातील वाढवण बंदर, अहमदाबाद-डहाणू चौपदरीकरण, पालघर मधून जाणारी बुलेट ट्रेन इ. प्रकल्पांसाठी आदिवासींच्या जमिनी संपादित केल्या जात असल्याच्या विरोधात आदिवासी व आदिवासींच्या विविध संघटनांनी मोर्चा काढून पालघर जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या राज्यपालांच्या अधिसूचनेनुसार ग्रामसभेचे अधिकार हिरावून घेतले जाणार असल्याने ही अधिसूचना रद्द करणे तसेच पेसा कायदा, १९९६ च्या तरतुदीप्रमाणे अनुसूचित क्षेत्रातील गावांची अधिसूचना काढून सर्व जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रांचा स्वतंत्र नकाशा तयार करण्याची मागणी देखील सदर निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) आदिवासी व शेतकऱ्यांना उध्वस्त करणारे पालघर जिल्ह्यातील विविध प्रकल्प (उदा. मुंबई-वडोदरा महामार्ग, वाढवण बंदर, बुलेट ट्रेन) रद्द करणे तसेच सुर्या प्रकल्पाचे पाणी प्रकल्पक्षेत्राबाहेर वळविण्याचा निर्णय रद्द करणे या मागण्यांसाठी भूमिपुत्र बचाव आंदोलनाच्यावतीने दिनांक १६/१२/२०१७ रोजी जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

विविध प्रकल्पांसाठी जमीन संपादित करताना ग्रामसभेची मान्यता घेण्याची तरतूद वगळण्यात आल्यासंदर्भातील अधिसूचना मा.राज्यपाल महोदय यांनी मागे घ्यावी, अशी मागणी सदर निवेदनाद्वारे केलेली आहे.

(३) व (४) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कायदेशीर विचार करण्याबाबत महसूल विभागास विनंती करण्यात आली आहे.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील उच्चदाब वाहिनीचे सबलीकरण करण्याबाबत

**(३) * ३८०४२ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील ३३/११ के.व्ही. या उपकेंद्रांमध्ये ५ एम.व्ही.ए. अतिरिक्त रोहित्र बसविणे, देवगाव-विंचूर ३३ के.व्ही. उच्चदाब वाहिनीचे सबलीकरण करण्याची मागणी दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तसेच येवला (जि.नाशिक) विधानसभा क्षेत्रातील विद्युत उपकेंद्रांमधून सिंगल फेज योजना सुरु करण्याची मागणी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुसूर, अंगुलगांव व भरवसफाटा या ठिकाणी प्रस्तावित असलेल्या विद्युत उपकेंद्रांची कामे देखील माहे जानेवारी, २०१८ पर्यंत सुरु झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) देवगाव, ता.निफाड येथील ३३/११ के.व्ही. उपकेंद्रामध्ये ३.१५ एम.व्ही.ए. चा अतिरिक्त रोहित्र फेब्रुवारी, २०१७ मध्ये कार्यान्वित करुन तेथील वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. ३३ के.व्ही. देवगांव-विंचूर वाहिनीचे काम पूर्ण करुन सदर वाहिनी दिनांक १०/०२/२०१८ रोजी कार्यान्वित करण्यात आली आहे.

येवला जिल्हा नाशिक क्षेत्रातील ३३/११ के.व्ही. विखरणी उपकेंद्रामध्ये स्पेशल डिझाईन रोहित्र बसवून त्याद्वारे कृषी वाहिनीवरील घरगुती ग्राहकांना भारनियमनाच्या काळात सिंगल फेज विद्युत पुरवठा करण्याची कामे दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेत मंजूर असून काम प्रगतीपथावर आहे.

इन्फ्रा-२ योजनेंतर्गत कानळद येथे (१x५ एम.व्ही.ए.) क्षमतेचे वीज उपकेंद्र मंजूर आहे व सदरच्या उपकेंद्रासाठी जागा दिनांक १८/०१/२०१८ रोजी उपलब्ध झालेली आहे. कानळद उपकेंद्र झाल्यानंतर या उपकेंद्रांवर वाकद, शिरवाडे, कोळगांव व कानळद या गावांचा वीज भार टाकण्यात येईल. जेणे करुन ३३ के.व्ही. देवगांव वीज उपकेंद्राचा वीज भार कमी होवून तेथे योग्य दाबाचा वीज पुरवठा होईल व भरवस फाटा परिसरात सुध्दा योग्य दाबाने वीज पुरवठा होवून या परिसरातील वीज पुरवठ्याबाबतच्या तक्रारी कमी होतील. ३३ के.व्ही. देवगांव उपकेंद्रासाठी १३२ के.व्ही. लासलगांव उपकेंद्रातून स्वतंत्र ३३ के.व्ही. वाहिनी कार्यान्वित झाल्यामुळे देवगांव उपकेंद्रातून भरवस फाटा परिसरात योग्य दाबाने वीज पुरवठा होण्यास मदत झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात तूर विक्री केंद्र सुरु करण्याबाबत

**(४) * ३८२७३ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तुरीला रुपये ५ हजार ४५० इतका हमीभाव जाहिर झाला असून खुल्या बाजारात सरासरी रुपये ४ हजार १०० इतका भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांना आधारभूत किंमतीपेक्षा १३५० रुपयांनी कमी दरात तूर विक्री करावी लागत असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुरीचा हंगाम संपत आला असतानाही यवतमाळ जिल्ह्यात एकही हमीभाव केंद्र शासनातर्फे सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना मिळालेला भाव व हमीभाव यातील फरकाची रक्कम मिळणे तसेच हमीभाव केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) नाही.

(२) व (३) यवतमाळ जिल्ह्यात आधारभूत किंमत दराने तूर खरेदीसाठी दिनांक ०५/०२/२०१८ नंतर पणन महासंघाकडून १२ व विदर्भ पणन महासंघाकडून ४ खरेदी केंद्र सुरु करण्यात आली आहेत. सदर खरेदी केंद्रावर दिनांक ०३/०३/२०१८ पर्यंत झालेली एकूण खरेदी ५६,९३२.५८ क्विंटल आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागातील कंत्राटी संगणक ऑपरेटरांना शासकीय सेवेत कायम करणेबाबत

**(५) * ३७७५८ श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत सन २००७-०८ पासून कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या संगणक ऑपरेटरांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शिफारशीसह समाजकल्याण आयुक्तालयामार्फत दिनांक ४ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आयुक्तालयामार्फत आक्षेपांची पूर्तता करून फेरप्रस्ताव दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केला असून लोकप्रतिनिधींनी देखील अनेकदा शासकीय अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसलेल्या, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी सामाजिक न्याय विभागांतर्गत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या संगणक ऑपरेटरांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनास दिनांक ०४/०८/२०१४ रोजी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयाकरिता कंत्राटी तत्वावर निर्माण केलेल्या विधी अधिकारी, विधी सहाय्यक, जनसंपर्क अधिकारी व संगणक ऑपरेटर या पदांवर सेवारत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करता येणार नसल्याचा निर्णय घेण्यात आलेला असून, त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यास समाजकल्याण आयुक्तालयास कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# अनुसूचित जाती प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याबाबत

**(६) * ३९३३१ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ३३७४८ ला दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी केंद्र शासनाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०१० च्या मार्गदर्शक तत्वानुसार अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिष्यवृत्तीसाठी केंद्र शासनाने विहीत दर लागू केलेले असले तरी सद्य:स्थितीच्या महागाईचा विचार करता शिष्यवृत्तीचे दर हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चासाठी अपुरे असल्याने त्यात वाढ करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) नाही, भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता केंद्र शासनाने विहित केलेल्या शिष्यवृत्तीच्या दराने राज्य शासनामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील लाभार्थींना शिष्यवृत्ती अदा केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही, सदरील बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे.

-----------------

## राज्यात महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण राबविण्याबाबत

**(७) * ३९५६५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला उद्योजकांसाठी दोन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक व एक लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट असलेले विशेष धोरण राबविण्याबाबतचा निर्णय दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त विशेष धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असणाऱ्या निधीची उपलब्धता कशाप्रकारे व किती कालावधीत करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील महिला उद्योजकांसाठी शासन निर्णय क्र. साप्रोयो-२०१७/ प्र.क्र.१५/उद्योग-८, दिनांक १४/१२/२०१७ अन्वये विशेष धोरण जाहीर केले आहे.

महिला उद्योजकांसाठी विशेष धोरणाचे उद्दिष्ट राज्यातील महिला परिचालित उद्योगांचे प्रमाण ९% वरुन २०% पर्यंत सुधारण्याचे आहे.

(२) या योजनेंतर्गत महिला उद्योजकांसाठी विशेष प्रोत्साहने देण्यात आलेली आहेत. जसे की भांडवली अनुदान, वीज अनुदान, व्याजदर अनुदान, उबवन केंद्र, साहस भांडवल निधी इत्यादी प्रोत्साहनांचा देखील धोरणामध्ये समावेश करण्यात आला आहे.

(३) सदर योजना सन २०१७-१८ च्या अंतिम टप्प्यात जाहीर झाल्यामुळे पुढील आर्थिक वर्षात म्हणजेच सन २०१८-१९ मध्ये प्रस्तुत धोरणाच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विद्युत प्रकल्पातून निघणाऱ्या राखेचा उपयोग रस्ते निर्मितीकरिता करण्याबाबत

**(८) * ३९५९१ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विद्युत प्रकल्पातून निघणाऱ्या राखेचा उपयोग रस्ते निर्मितीकरिता करण्यासाठी राज्य शासनाकडून राख धोरण तयार करुन महाजेम्सची स्थापना करण्यात आली असूनही कोराडी (जि.नागपूर) येथील औष्णिक विद्युत प्रकल्पात निर्माण होणाऱ्या राखेचा रस्ते निर्मितीकरिता उपयोग करण्यात येत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत रस्ते निर्मिती क्षेत्रातील कोणत्याही कंपनीशी आतापर्यंत करार झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रस्ते निर्मिती क्षेत्रातील कंपन्यांशी करार न होण्याची कारणे काय आहेत, करार न झाल्याने शासनाच्या महसूलाचे किती नुकसान झाले आहे तसेच यांस दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महानिर्मिती कंपनीच्या कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या राखेच्या बंधाऱ्यातून माहे एप्रिल, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत एकूण २,४८,५२२ मे.ट. राखेचा विनियोग झालेला आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांच्या अंतर्गत प्रगतीत

असलेल्या काँक्रीट रस्ता, उड्डाणपूल, रेल्वे उड्डाणपूल, उड्डाणपूलांचे जोडरस्ते यांचे बांधकाम आणि इमारतीच्या बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या विटा यामध्ये डिसेंबर, २०१७ अखेर पर्यंत सुमारे ५६२६४ घनमीटर फ्लाय अॅशचा वापर करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरोरा (जि.चंद्रपूर) शहरात आग लागून नुकसान झाल्याबाबत

**(९) * ३९९९७ श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) शहरातील महापारेषण विभागाच्या २२० के.व्ही. उपकेंद्राला दिनांक ०२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागल्याने नुकसान होवून परिसरातील ३५ गावांमधील विद्युत पुरवठा खंडित झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आगीमध्ये जीवित व वित्तहानी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याचा सर्वसाधारण तपशिल काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील महापारेषण कंपनीच्या २२० के.व्ही. उपकेंद्रातील ३३ के.व्ही. करंट ट्रान्सफार्मर व ३३ के.व्ही. लाईटनिंग अरेस्टर (एलए) या दुय्यम उपकरणांमध्ये बिघाड होऊन ते फुटले व नादुरुस्त झाले त्यामुळे उपकेंद्रामधील विद्युत पुरवठा पूर्णत: खंडित झाला होता. सदर घटनेमध्ये २२० के.व्ही. च्या रोहित्रांचा स्फोट झालेला नव्हता तसेच रोहित्राला आगही लागलेली नव्हती. सदर घटनास्थळीच्या ३३ के.व्ही. ची नादुरुस्त झालेली उपकरणे बदलण्यात आली आहेत.

(२) व (३) सदर आगीमध्ये जीवितहानी झालेली नसून आगीमुळे महापारेषण कंपनीचे सुमारे ६० हजार रुपये किंमतीच्या उपकरणांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, महापारेषण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांनी नादुरुस्त उपकरणे तातडीने वेगळी करुन विद्युत पुरवठा पूर्ववत केला.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्हयातील शेतकऱ्याने भूसंपादनातील गैरकारभारामुळे आत्महत्या केल्याबाबत

**(१०) * ४०४६० श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोंडाईचा सोलर पार्क (जि.धुळे) मधील प्रकल्पग्रस्त असलेल्या एका शेतकऱ्याच्या ५ एकर जमिनीचा मोबदला रुपये ४ लाख ३ हजार परंतु त्याच्याच शेजारील दोन एकर जमिनीचा मोबदला एजंटच्या माध्यमातून रुपये १ कोटी ८९ लाख देण्यात आल्याने ५ एकर शेती असलेल्या ८० वर्षीय शेतकऱ्याने दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी विष प्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केल्याने त्याचा दिनांक २८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यास त्याच्या जमिनीचा योग्य मोबदला न देणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दिनांक २२/०१/२०१८ रोजी श्री.धर्मा मंगा पाटील वय ७६ वर्ष मु.पो. विखरण, ता.शिंदखेडा, जि.धुळे यांच्या शेतजमिनीचा काही भाग औष्णिक विद्युत प्रकल्पाकरिता संपादित केल्यामुळे, सदर जमिनीचा वाढीव मोबदला मिळावा याकरिता मंत्रालयात आले असता, विषारी पदार्थ पोटात गेल्याने त्यांना अस्वस्थ व मळमळ जाणवत होते म्हणून मंत्रालयातील कार्यरत पोलिसांनी त्यांना सेंट जॉर्ज रुग्णालयात दाखल केले होते. तद्‌नंतर ते दिनांक २८/०१/२०१८ रोजी मयत झाले.

(२) श्री.धर्मा पाटील यांच्या शेतजमिनीचा निवाडा भूसंपादन अधिकारी यांनी दिनांक १७/०३/२०१५ रोजी घोषित केला होता व त्यानुसार त्यांच्या मालकीच्या गट नं. २९१/२-अ ची भूसंपादन मोबदल्याची रक्कम रुपये २,१८,६१७/- दिनांक १३/०४/२०१७ रोजी त्यांनी स्विकारली आहे.

निवाडा घोषित केल्यानंतर, भूसंपादन अधिकाऱ्यांना त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार नाही. वाढीव मोबदल्यासाठी संबंधित भूधारकास भूसंपादन अधिनियम, १८९४ चे कलम १८ व नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम ६४ अन्वये दिवाणी न्यायालयात भूसंदर्भ दाखल करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये श्री.धर्मा मंगा पाटील यांनी भूसंदर्भ दाखल केलेला नाही. तथापि श्री.धर्मा मंगा पाटील यांनी त्यांच्या शेतातील व फळझाडांचे मूल्यांकन व शेतीच्या क्षेत्रफळानुसार मोबदला मिळाला नाही व इतर शेतकऱ्यांना जास्त मोबदला देण्यात आला व आपणास कमी मोबदला मिळाल्याबाबत दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, धुळे व जिल्हा कृषी अधिकारी, धुळे यांना गट क्र. २९१/२-अ ची तपासणी करुन मुल्यांकन करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडून सानुग्रह अनुदानाचा प्रस्ताव प्राप्त झाला असून कै.धर्मा पाटील यांना पूर्वी अदा करण्यात आलेली मोबदल्याची रक्कम, प्रस्तावित सानुग्रह अनुदानाच्या रकमेतून वजा करुन, देय असलेली रक्कम रुपये २४,६४,५८२/- अदा करण्यास महानिर्मिती कंपनीस कळविण्यात आले होते. त्यानुसार दिनांक २२/०२/२०१८ रोजी त्यांच्या खाती सदरची रक्कम जमा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत

**(११) * ४०४९५ श्री.धनंजय मुंडे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातून कर्जमाफीसाठी भरलेले अर्ज आणि बँकांनी दिलेल्या माहितीत तफावत असल्याने तसेच यादीत नाव असूनही रक्कम मिळत नसल्यामुळे जिल्ह्यातील दीड लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळण्यास अडचण निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयात ऑनलाईन अर्ज केलेल्या २ लाख ५८ हजार शेतकऱ्यांपैकी केवळ ९० हजार शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ झाला असून ९ हजार शेतकरी कर्जमाफीसाठी अपात्र ठरले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील कर्जमाफीच्या लाभापासून वंचित असलेल्या उर्वरीत शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे व अपात्र ठरलेल्या शेतकऱ्यांच्या यादीची पुन्हा तपासणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत कोल्हापूर जिल्हयातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., कोल्हापूर व राष्ट्रीय/व्यापारी/खाजगी/ग्रामीण बँकांकडील २,७०,७८४ एवढ्या खातेदार शेतकऱ्यांनी आपले सरकार पोर्टलवर दिनांक २२/९/२०१७ पर्यंत ऑनलाईन अर्ज दाखल केले होते. त्याचप्रमाणे बँकांनीही योजनेप्रमाणे त्यांच्याकडील कर्जदार शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर ऑनलाईन अपलोड केली. त्यावर संगणकीय पध्दतीने प्रक्रिया होऊन माहे जानेवारी, २०१८ अखेर कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील ९०३४३ कर्जखात्यांना योजनेप्रमाणे कर्जमाफी व प्रोत्साहनपर लाभ म्हणून रूपये १७५.३६ कोटी एवढा लाभ देण्यात आला.

तथापि, बँकांनी सादर केलेल्या माहितीमधील त्रुटी व शेतकऱ्यांच्या अर्जामध्ये असलेल्या अपुऱ्या माहितीमुळे ताळमेळ होऊ शकला नाही. अशा प्रकरणी शासनाने गठीत केलेल्या उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या अध्यक्षतेखालील गठीत तालुकास्तरीय समितीमार्फत शहानिशा करून दिनांक २६/०२/२०१८ अखेर ७७६९३ कर्जखात्यांना योजनेप्रमाणे रूपये १२५.०३ कोटी इतक्या रकमेचा कर्जमाफी व प्रोत्साहनपर लाभ देण्यात आला आहे.

अशाप्रकारे दिनांक २६/०२/२०१८ अखेर कोल्हापूर जिल्ह्यातील कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., कोल्हापूर या बँकेकडील एकूण १६८०३६ कर्जखात्यांना योजनेप्रमाणे रूपये ३००.३९ कोटी इतक्या रकमेची कर्जमाफी व प्रोत्साहनपर लाभ म्हणून देण्यात आलेला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील व्यापारी बँकांकडूनही सदर योजनेच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे. दिनांक २६/०२/२०१८ अखेर व्यापारी बँकांकडून १४०४२ कर्ज खात्यांना रूपये ४९.१४ कोटी लाभ देण्यात आलेला आहे.

अशाप्रकारे दिनांक २६/०२/२०१८ अखेर कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व व्यापारी बँकांकडील एकूण १८२०७८ कर्जखातेदारांना योजनेप्रमाणे रूपये ३४९.५३ कोटी इतक्या रकमेची कर्जमाफी व प्रोत्साहनपर लाभ देण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बँकांनी सादर केलेल्या माहितीमधील त्रुटी व शेतकऱ्यांच्या अर्जामध्ये असलेल्या अपुऱ्या माहितीमुळे ताळमेळ होऊ शकला नाही. अशा प्रकरणी शासनाने गठीत केलेल्या उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या अध्यक्षतेखालील गठीत तालुकास्तरीय समितीमार्फत शहानिशा करून दिनांक २६/०२/२०१८ अखेर ७७६९३ कर्जखात्यांना योजनेप्रमाणे रूपये १२५.०३ कोटी इतक्या रकमेचा कर्जमाफी व प्रोत्साहनपर लाभ देण्यात आला आहे.

योजनेच्या निकषांनुसार अर्ज करण्यास वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन पध्दतीने दिनांक १ मार्च, २०१८ ते ३१ मार्च, २०१८ पर्यंत अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून त्याप्रमाणे अर्ज प्राप्त होण्यास सुरूवात झाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इंदापूर (जि.पुणे) तालुक्यात गॅस व पेट्रोलियमजन्य पदार्थ आढळल्याबाबत

**(१२) * ४०९९३ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, अ‍ॅड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.जगन्नाथ शिंदे, अ‍ॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर (जि.पुणे) तालुक्यातील बावडा, वकीलवस्ती, सुरवड, शेटफळ, हवेली, वडापुरी, झगडेवाडी, गोखळी, तरंगवाडी, वनगळी, रजवडी, बनकरवाडी, करेवाडी, अगोटी नं. २ या १४ गावांमध्ये भूगर्भात पेट्रोल, गॅस व पेट्रोलियम पदार्थ असण्याची शक्यता वर्तविल्याने तेथील जमिनीवर बोअरवेल करुन चाचण्या सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातून अनुकूल निष्कर्ष निघाल्यास राज्यातील २५ जिल्ह्यातून अशा प्रकारचा डाटा संकलित करुन त्याबाबतची माहिती केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी सुमारे ६५० कोटी रुपये खर्च येणार असून यातून अकुशल कामगारांसाठी चार वर्ष रोजगार उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय. केंद्रिय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू विभागाने सदर काम ONGC कडे सोपविले आहे.

(२) सदरची बाब ही केंद्र शासन व ONGC यांच्या अखत्यारीतील आहे.

(३) होय. ओएनजीसी यांचेकडील पत्रात तसे नमूद आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना आश्रमशाळेत प्रवेश देण्याबाबत

**(१३) * ४१०७२ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सततच्या दुष्काळाने मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या अनेक कुटुंबांना उदरनिर्वाह चालविणे तसेच मुलांना शिक्षण देणे शक्य होत नसल्याने आश्रमांमध्ये प्रवेशासाठी नोंद केलेल्या १४७७ विदयार्थ्यांची प्रतिक्षा यादी आधारतीर्थ आश्रमाकडे असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यार्थ्यांपैकी ५६१ मुलांना प्रवेश देण्यास आश्रमाकडून असमर्थता दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) आधारतीर्थ आश्रम ही एक अशासकीय संस्था (NGO) असून या संस्थेस या विभागाची कोणतीही मान्यता नाही किंवा या संस्थेस या विभागाकडून कोणतेही अनुदान देण्यात येत नाही. त्यामुळे संस्थेकडील प्रवेशासंदर्भात या विभागाकडून कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुलींच्या वसतिगृहांवर महिला गृहपाल व सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्याबाबत

**(१४) * ३९३६८ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५२१९ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुलींच्या वसतिगृहांवर महिला गृहपाल व सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्यासंबंधी विभागातील नियमित पदांचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त आकृतिबंध निश्चित करुन सदर वसतिगृहांवर महिला गृहपाल व सुरक्षारक्षकांची नियुक्ती करणेसंबंधीची कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) व (२) विभागातील नियमित पदांचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही अद्यापी सुरु आहे.

तथापि, शासनामार्फत प्रत्येक वसतिगृहांसाठी बाह्यस्त्रोताद्वारे विद्यार्थी संख्येनुसार अटेंडन्ट, सुरक्षारक्षक, स्वच्छतेसाठी सफाईगार व माळी यांची नियुक्ती केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी आश्रमशाळेतील सुरक्षारक्षकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(१५) * ४०८८० श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित आश्रमशाळांमध्ये सुरक्षारक्षकांची पदे निर्माण करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सुरक्षारक्षकांना प्रति माह रुपये ५०००/- इतके तूटपुंजे मानधन देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुरक्षारक्षकांचे मानधन वाढवून देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक २३/०१/२०१४ अन्वये आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील ५५६ अनुदानित आश्रमशाळांमध्ये मानधन तत्वावर ५५६ पहारेकरी/सुरक्षारक्षकांची पदे मंजूर करण्यात आली आहेत. सदर पदे दरमहा रुपये ३२००/- इतक्या एकत्रित मानधनावर भरण्यास मंजूरी देण्यात आली होती. तद्नंतर महाराष्ट्र अनुदानित आदिवासी आश्रमशाळा चालक संस्था, नाशिक यांनी केलेल्या विनंतीस अनुसरुन दिनांक १८ जून, २०१६ च्या शासन निर्णयान्वये पहारेकरी/सुरक्षारक्षक पदाचे मानधन दरमहा रुपये ५०००/- इतके मंजूर करण्यात आले.

(३) सदर पदाचे मानधन वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.